वाचलेः- १) महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील नियम १०(१)

२) मा. आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/२/कावि/४४७/१५, दि. २०/१०/२०१५.

३) मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय खराळवाडी यांचे दि. ०९/१०/२०१७ रोजीचे पत्र.

४) मा. लेखाधिकारी यांचेकडील दि.२०/०७/२०१७ चे घरबांधणी अग्रीम नाहरकत प्रमाणपत्र.

५) मा. शिक्षणाधिकारी यांचेकडील दि.१२/१०/२०१७ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र. माध्य/शि/१/कावि/१०८३ /१७
दि. १२/ १० /२०१७

विषय – <u>नियत वयोमानानूसार सेवानिवृतीबाबत.</u>
श्रीम.शेख फौजिया शफिक, सहाय्यक शिक्षिका
(संगणक क्रं.५९७२)

आदेश,

श्रीम.शेख फौजिया शफिक, सहाय्यक शिक्षिका हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक शिक्षिका या पदावर माध्यमिक शिक्षण विभागात दि.१०/०७/१९८७ रोजी रूजू झालेल्या आहेत. श्रीम.शेख फौजिया शफिक, सहाय्यक शिक्षिका, यांची जन्मदिनांक १०/१०/१९५९ अशी असून त्यांच्या वयास दिनांक ०९/१०/२०१७ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्रीम.शेख फौजिया शफिक, सहाय्यक शिक्षिका यांना ३१/१०/२०१७ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत करणे आवश्यक आहे.

शासकीय कर्मचारी तो ज्या महिन्यात ५८ वर्ष वयाचा होईल, त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल, तसेच ज्या शासकीय कर्मचा-याची जन्मतारीख ०१ असेल तो कर्मचारी यथास्थिती ५८ वर्ष वयाचा होताच मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल, अशी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन) नियम-१९८२ मधील नियम १०(१) मध्ये तरतूद आहे.या तरतूदीप्रमाणे श्रीम.शेख फौजिया शफिक, सहाय्यक शिक्षिका हया दिनांक ३१/१०/२०१७ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत होतील.

श्रीम.शेख फौजिया शफिक, सहाय्यक शिक्षिका यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.**<u>श्रीम.शेख फौजिया शफिक, सहाय्यक शिक्षिका यांना सेवासातत्य देण्यात आलेले नाही.</u>** ते दि.१०/०७/१९८७ पासुन मनपाच्या सेवेत सहाय्यक शिक्षक या पदावर कार्यरत आहेत.

श्रीम.शेख फौजिया शफिक, सहाय्यक शिक्षिका यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज, घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, घर दूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम यांचेकडील कर्ज



Scanned with CamScanner

येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत. घरबांधणी अग्रीम थकबाकी नसलेबाबत वाचले क्र.४ अन्वये मा. लेखाधिकारी यांनी अभिप्राय दिलेला आहे. त्याच प्रमाणे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचे कडील दि.१२/०९/२०१७ रोजीचा थकबाकी नसले बाबतचा दाखला सादर केलेला आहे. भविष्यात लेखा परिक्षणानुसार काही येणे-देणे रक्कमा निघाल्यास त्यांची वसुली श्रीम.शेख फौजिया शफिक, सहाय्यक शिक्षिका यांचे निवृत्तीवेतनातुन वसुल करणेत येईल.

सबब, मी शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - ४११ ०१८, उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्रीम.शेख फौजिया शफिक, सहाय्यक शिक्षिका, यांना दिनांक ३१/१० /२०१७ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद श्रीम.शेख फौजिया शफिक, सहाय्यक शिक्षिका यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

12/10/2017

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्रीम.शेख फौजिया शफिक, सहाय्यक शिक्षिका
माध्यमिक विद्यालय खराळवाडी

प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष, मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय खराळवाडी
२/- पुढील कार्यवाहीसाठी



Scanned with CamScanner